# प्रकरण - सहावे

# उपसंहार

## प्रकरण ६ वे

# उपसंहार

कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील सर्वात मोठे संस्थान होते. कोल्हापूर राज्याची स्थापना सन १७१० मध्ये झाली आणि ते १ मार्च १९४९ पर्यंत कोल्हापूर राज्याचे अस्तित्व टिकून होते. कोल्हापूर संस्थानमधील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता येथील भौगोलिक वैशिष्ट्यामध्ये विविधता आढळून येते. राज्याच्या विकासामध्ये आणि लोक जीवनामध्ये भौगोलिक परिस्थितीचा महत्वाचा वाटा असतो. पोषक भौगोलिक परिस्थिती नसेल तर अती प्रयत्न करुन देखील म्हणावा तेवढा आर्थिक विकास साधता येत नाही. या बाबतीत कोल्हापूर संस्थानची भौगोलिक परिस्थिती आर्थिक उन्नत्तीसाठी अनुकूल होती असे म्हणावे लागेल. अर्थात त्यामध्ये भौगोलिक विविधता आढळून येते. कोल्हापूर संस्थानात पश्चिम विभागात सह्याद्रीच्या डोंगररांगा जास्त प्रमाणात आहेत. त्यामुळे त्या डोंगराळ प्रदेशात लागवडीखालील जमिनीचे प्रमाण जास्त होते. पण हा भाग कोकण प्रदेशाला लागून असल्याने येथे पावसाचे प्रमाण चांगले आहे. त्यामुळे पश्चिम भागातील शेतजमिनीमध्ये भात, नागली, वरी यासारखी पीके घेतली जातात. कोल्हापूर संस्थानच्या पूर्व भागात मात्र उत्तम प्रकारची काळी जमीन असल्याने तेथे कापूस, तंबाखू, ज्वारी यासारखी पिके घेतली जात. पूर्व भागातील पावसाचे प्रमाण पश्चिम भागाच्या तुलनेने कमी होते. तरीही जमीन पावसाची परिस्थिती सदासर्वकाळ चांगलीच होती. तसेच कोल्हापूर संस्थानातील नद्या या पूर्ववाहिन्या वाहत असल्यामुळे सुपीक गाळाची जमीन तयार झाली होती आणि येथील हवामान देखील भौगोलिक परिस्थितीला अनुकूल होते. काही वेळेला दुष्काळासारख्या संकटालाही या भागातील शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागे. पण

एकंदरित तौलनिकदृष्ट्या अभ्यास केला तर कोल्हापूर संस्थानची भौगोलिक परिस्थिती आर्थिक विकासासाठी बऱ्याच अंशी अनुकूल होती असे म्हणावे लागते.

कोल्हापूर हे 'दक्षिण काशी' म्हणून प्रसिद्ध आहे. करवीर हा शब्द कधी रुढ झाला व कोल्हापूरला कोल्हापूर हे नाव कसे पडले याविषयी बरेच मतभेद दिसून येतात व बऱ्याच व्युतपत्ती या नावाविषयी सांगितल्या जातात. श्री महालक्ष्मीचे मंदिर स्थापन झाल्यानंतर कोल्हापूरला करवीर असेही म्हणण्यात येऊ लागले. अगदी प्राचीन काळापासून कोल्हापूरवर मौर्य, सातवाहन, चालुक्य, शिलाहार, यादव, बहामनी आणि आदिलशहा यांसारख्या राज्यकर्त्यांनी राज्य केलेले आहे. ताराराणीने १७१० मध्ये पन्हाळा येथे मराठा गादीची स्थापना केली आणि हेच पुढे कोल्हापूर राज्य म्हणून उदयास आले. शिवाजी दुसरा यांच्या काळात १८१२ मध्ये तह झाल्याने करवीर छत्रपतीची उज्ज्वल परंपरा उतरणीला लागली आणि कोल्हापूर संस्थान इंग्रजी साम्राज्याच्या संरक्षणाखाली आले. इ. स. १८४४ पासून आधुनिक कोल्हापूरची सुरुवात झाली असे म्हणता येईल. कारण १८४४ मध्ये मेजर ग्रॅहम याची नेमणूक झाली आणि इंग्रजांच्या धर्तीवर चालणारी नवी राज्यकारभार यंत्रणा अमलात आणली. कोल्हापूर राज्यामध्ये एकूण ६ परगणे व ९ मांडलिक म्हणजे जहागिऱ्या होत्या. खऱ्याअर्थाने ६ परगण्याचे मिळून कोल्हापूर राज्य बनलेले होते.

संस्थानचा आर्थिक पाया मजबूत असेल तर राज्य मजबूत बनते. १९०१ ते १९४९ हा आधुनिक कालखंड असला तरी १९ व्या शतकातील कृषी व्यवस्थेचा विचार केला तर १९ व्या शतकाच्या पूर्वाधात आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याचे दिसून येते. कारण आर्थिक विकासाचा महत्वाचा कणा म्हणजे शेती विकास होय. राज्याच्या आर्थिक विकासामध्ये भर टाकणारी बाब म्हणजे जमीन महसूल असतो. परंतु बऱ्याच जमिनी ह्या देणगी किंवा इनामाच्या रुपाने देण्यात आल्या होत्या. त्यामुळे ह्या देणगी

रुपाने देण्यात आलेल्या जमिनीवरती कोणत्याही प्रकारचा सारा नसल्यामुळे राज्याचा महसूल तुलनेने कमी होता. त्यामुळे एकंदरित आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याचे दिसून येते.

कोल्हापूर राज्यातील शेतीचा विचार केला तर आपल्याला असे दिसून येते की, जमीन मुख्यत्वे काळी, तांबडी, मळी आणि खारी म्हणजे पांढर होती. येथील बरीचशी शेती पावसावर अवलंबून होती. त्यावेळी कालवे नव्हते. शेतकरी नद्या किंवा ओढ्यांवर मातीचे बांध घालून बागायत शेती करत होते. खरीप आणि रब्बी अशी शेतकरी दोन पिके घेत असत. त्यामध्ये भात आणि ज्वारी हे प्रमुख पीक होते.

कोल्हापूर प्रांतामध्ये जमिनीचा सारा हा पिकांच्या मगदुराप्रमाणे घेतला जात असे. बऱ्याच जमिनी देणगी स्वरुपाने वाटल्याचे दिसून येते. त्याचबरोबर पड जमिनी, शेरी जमीन, इनाम जमीन हे जमीनीचे प्रकार असल्याचे दिसून येते.

कोल्हापूर संस्थानातील बहुतांश लोकांची उपजिविका शेतीवर अवलंबून होती. पाऊस वेळेवर पडला तर शेतीतून बऱ्यापैकी उत्पादन निघत होते. पण काही वेळेला दुष्काळासारख्या संकटांना सामोरे जावे लागत असे. अर्थात दुष्काळावर मात करण्यासाठी रस्ते, पूल बांधणे, तलाव बांधणे, तलाव दुरुस्त करणे, शेतकऱ्यांना तगाई स्वरुपात कर्जे देणे, जनावरांना चारा, पाणी उपलब्ध करुन देणे अशा योजना ही या राज्यकर्त्यांनी राबवल्या.

१९०१ ते १९४९ या कालखंडात छत्रपती शाहू महाराज व छत्रपती राजाराम महाराज या दोन्ही राज्यकर्त्यांनी आपल्या संस्थानमध्ये कृषीविषयक धोरण अत्यंत चांगल्याप्रकारे राबविले. त्यामुळे कोल्हापूर प्रांतातील शेतकरी समृद्ध झाला.

दुष्काळ किंवा पूर या आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना साऱ्यामध्ये सवलत देऊन त्यांना शेती सुधारणेसाठी तगाई स्वरुपात कर्जाची मदत केली. जमिनीचे सर्वेक्षण करुन

जमिनीच्या सीमा निश्चित केल्या त्यानुसार अधिक जमिनी लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न केला.

शेतीला पर्याय म्हणून बागायती व इतर नवीन लागवडीचे अनेक प्रयोग करण्यास त्यांनी उत्तेजन दिले. पश्चिमेकडील सह्याद्रीच्या डोंगर उतारावर चहा, कॉफी, कोको, रबर, वेलदोडे या प्रकारच्या उत्पादनाचे प्रयोग या राज्यकर्त्यांनी केले. त्यातून चहाच्या लागवडीचा प्रयोग यशस्वी झाला. संस्थानात उत्पादित झालेला पन्हाळा चहा नं. ४ या नावाने तो प्रसिद्धीस आला. थोडक्यात, पारंपरिक पिकाबरोबरच चहा किंवा कॉफीच्या नगदी पिकांकडे शेतकरी वळावा ही कल्पना काही प्रमाणात यशस्वी झालेली दिसते. यामुळे या कालखंडात पडीक जमिनी लागवडीखाली आणण्यात आल्या आणि लागवडीयोग्य जमिनीचे प्रमाण वाढले म्हणजेच शेतीच्या बाबतीत या कालखंडात विकास घडवून आणण्याचा प्रयत्न झाला हे स्पष्ट होते.

निसर्गाची लहर बऱ्याचदा शेतीच्या विकासात अडथळा आणते. कोल्हापूरही याला अपवाद नव्हते. यातून मार्ग काढण्यासाठी व शेतीला कायम पाणीपुरवठा करण्यासाठी शाहू महाराजांनी १९०९ मध्ये राधानगरी धरणाची योजना हाती घेतली आणि त्याद्वारे शेतीला पाणीपुरवठा केला. या धरणामुळे या परिसरातील इंच आणि इंच जमीन बागायती झाली. त्यातून येथील शेतकरी ऊस, तंबाखू आणि कापूस यासारखी नगदी पिके घेऊ लागला. त्यामुळे कोल्हापूर राज्यात हरितक्रांती घडून आली. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने हरितक्रांतीची योजना तयार केली व ती बऱ्याच अंशी यशस्वीही झाली. पण अशी हरितक्रांती शंभर वर्षापूर्वी महाराष्ट्रात शाहू महाराजांनी घडवून आणली. विशेषत: आज महाराष्ट्रात सांगली, सातारा, सोलापूर इ. जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झाले असताना कोल्हापूर जिल्ह्याचे नाव दुष्काळग्रस्तांच्या यादीत नाही याचे श्रेय शाहू

महाराजांकडे जाते. त्यामुळे त्यांना हरितक्रांतीचे जनक म्हटल्यास खऱ्याअर्थाने योग्य ठरेल.

कोल्हापूर संस्थान हे शेतीप्रधान अर्थव्यवस्था असल्याने परंपरागत पद्धतीने शेती करण्यापेक्षा सुधारित पद्धतीने शेती करणे आवश्यक आहे याचे महत्व आज पटलेले आहे. पण विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात याची जाणीव असणे व त्या दिशेने स्वत: जातीने प्रयत्न करुन ते अमलात आणणे हे विशेष होते. आपल्या युरोप दौऱ्यात आधुनिक पद्धतीच्या शेतीचे शाहू महाराजांनी निरीक्षण केले व अशा प्रकारचे आधुनिक शेतीचे प्रयोग राबवून आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी १९१२ मध्ये 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' ची स्थापना केली. या संस्थेला जोडूनच आधुनिक कृषी अवजारांच्या म्युझियमची स्थापना केली. शेतकऱ्यांना कृषी अवजारांचे व बी-बियाणांचे ज्ञान व्हावे म्हणून अनेक शेतकी प्रदर्शने भरविली तसेच अनेक शेतकी शिक्षण देणाऱ्या शेतकी शाळा सुरु करण्यात आल्या.

शेतकऱ्यांच्या अनेक जमिनी सावकारी पाशात अडकलेल्या होत्या. शाहू महाराजांना या जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करुन द्यायच्या होत्या. कारण त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीकरिता प्रोत्साहन मिळणार होते. या हेतूने त्यांनी कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठी कर्ज देण्यास सुरुवात केली. त्यासाठी राणी व्हिक्टोरिया स्मरणार्थ निधी स्थापन करुन यामधून शेतकऱ्यांनी आपली जमीन ताब्यात घेतली. पुढे १९४० मध्ये राजाराम महाराज यांनी कर्जमुक्ती कायदा करुन संस्थानातील गरीबातील गरीब शेतकऱ्यांकडे लक्ष दिल्याचे दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराज यांनी शेती ही ग्रामीण जीवनाच्या परिवर्तनाचा मार्ग आहे हे जाणले होते. आपल्या संस्थानातील शेतीच्या विकासासाठी व शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी त्यांनी राधानगरी धरण पूर्ण केले. राजाराम तलाव बांधला.

त्याचबरोबर संस्थानातील अनेक नद्यांवर उन्हाळ्यात पाणी अडविण्यासाठी बंधारे बांधले. आज देखील हे कोल्हापूर पद्धतीचे कमी खर्चातील बंधारे भारतभर लोकप्रिय झाले आहेत. त्यामुळे ऊस शेतीचा विकास झाला. साखर कारखानदारी वाढीस लागली व हरितक्रांती झाली. या हरितक्रांतीमुळे आज कोल्हापूर जिल्ह्यात धवलक्रांती झाली आहे हे दिसून येते.

कोल्हापूर संस्थानात लागू केलेली सहकार चळवळ हा देखील एक वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग होता. यामुळे शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्तता झाली व अल्प व्याजाने कर्ज मिळू लागले. कोल्हापुरातील सहकार चळवळीला जे अभूतपूर्व यश लाभले त्याचे कारण लोकांच्या गरजेत होते. गरज भागविण्यासाठी लोकांनी स्वत:हून जी उपक्रमशीलता सुरु केली ती ही सहकार चळवळ होती. आज खेडोपाडी सहकारी सोसायट्या व तालुक्या तालुक्यात चालेले सहकारी साखर कारखाने हे याचेच फळ आहे. सहकारी साखर कारखाने हे कोल्हापूरचे वैशिष्ट्य आहे. या कारखान्यामुळे या कारखान्याच्या परिसरातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती चांगली सुधारली व सर्वसामान्य शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढला. भांडवलशाही व समाजवाद यांना मध्यम पयाय म्हणून सहकार चळवळीचा पुरस्कार भारत सरकार आज सर्व राज्यातून करीत आहे आणि या सहकार चळवळीत कोल्हापूरच्या शेतकरी संघाचे कार्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. १९६० नंतर महाराष्ट्र सरकारने सुरु केलेल्या सहकारी चळवळीचा पाया छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात घातला गेला. आज पश्चिम महाराष्ट्र सहकार चळवळीत अग्रगण्य समजला जातो. त्याचे श्रेय राजाराम महाराजांकडे जाते.

छ. राजाराम महाराजांनी पाटबंधाऱ्यांच्या अनेक योजना राबवून शेती उत्पादनामध्ये वाढ घडवून आणली. त्यांनी कृषी क्षेत्रासाठी अत्यंत भरीवसुधारणा दिल्या तरीही शेतसाऱ्याचा प्रश्न पूर्णत: निकालात निघाला नव्हता असे दिसते. १९३९ मधील शिरोळ पेट्यातल्या शेतकऱ्यांचा मोर्चा निघण्यामागची नेमकी कारणे समजावून घेतली

पाहिजेत. छत्रपतींच्या लाडक्या डुकरापासून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीला कंटाळलेले शेतकरी आणि त्यातच शिरोळ पेट्यात शेतसाऱ्यात झालेली वाढ हे तात्कालिन कारण असावे. विशेषत: प्रजापरिषदेच्या नेत्यांनी या असंतोषाच्या ठिणगीला चांगलीच हवा दिली असावी. कारण प्रजा परिषद चळवळ ही मुख्यत: राजकीय हक्कांसाठी होती. आणि कोल्हापूर संस्थानात प्रजेला राजकीय हक्क मुळीच नव्हते असे म्हणता येणार नाही. कारण १९२६ मध्येच पंचायत संस्था कायद्यान्वये संस्थानात इलाखा पंचायत, तालुका पंचायत व ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आलेल्या होत्या व त्याद्वारे प्रत्यक्ष राज्यकारभार जनतेच्या ताब्यात आलेला होता. पण प्रजापरिषद चळवळीला शेतकऱ्यांच्या मोर्चाच्या निमित्ताने एक हत्यार मिळाले असावे किंवा संस्थानाद्वारा वारंवार प्रसिद्ध केलेल्या आदेशांकडून तरी असे वाटते की शेतसाऱ्याच्या संदर्भात प्रजा परिषदेकडून गैरसमज पसरवले जात आहेत असे लोकांना सांगण्याचा, पटवून देण्याचा संस्थानातर्फे प्रयत्न केला जात होता. शेतकऱ्यांच्या मोर्चाच्या एका घटनेवरुन राजाराम महाराज किंवा त्यांच्या आधीच्या शाहू महाराजांच्या कारकीर्दीत केल्या गेलेल्या शेती सुधारणांचे अवमूल्यन करता येणार नाही. १९०१ ते १९४९ या संपूर्ण कालखंडाचा एकत्रितपणे विचार केला असता तो कृषी विकासात पोषक होता हे दिसून येते. या दोन्ही राज्यकर्त्यांचे धोरण शेतीमध्ये मूलभूत सुधारणा घडवून आणण्याचे होते हे निर्विवादपणे मान्य करावे लागते.

# संदर्भग्रंथ सूची

# संदर्भग्रंथ सूची


## कोल्हापूर पुराभिलेखागार, कोल्हापूर

### अस्सल अप्रकाशित संदर्भ साधने

शाहू दप्तर रुमाल नंबर : १७

हुजुर ठराव बुक : १९०३, १९०८, १९२५, १९२७, १९३०, १९३४, १९३५, १९३९

हुजुर सरकारचे गॅझेट : १९०३,१९१३,१९२१,१९२६,१९२९,१९३८

प्रजापरिषद चळवळीसंबंधी कॉन्फिडेन्शियल बारनिशी सन १९३९ नं. ४१२

शाहु छत्रपती मिल फाईल १९२७, नंबर. २४९

शेतसारा कमी करणेबाबत झालेली चळवळ १९३८, नंबर. ३८

पोलिस फाईल १९४१, नंबर. १४१

प्रजापरिषद चळवळीची फाईल : होम डिपार्टमेंट, फाईल नं. ३५९

कॉन्फिडेन्शियल: १९४०, फाईल नं. ५०३

कॉन्फिडेन्शियल फाईल (C.I.D. विभाग ) –१९४७–४८, फाईल नं. ३८१

### प्रकाशित इंग्रजी प्राथमिक साधने

Graham D. C. : Statistical Repot on the Principality of Kolhapur, Bombay, 1954.

Kolhapur State : Report on the industrial Survey of Kolhapur, Education Society's Press, Bycalla, Bombay. 1895.

Kolhapur State : Report of Geological Survey of Kolhapur State and S. M. C., Bombay Presidency, 1891.

Report on Kolhapur Agriculture Exhibition, 1921.

Regional Survey Economic Sources, India and Kolhapur, 1959.

Report on the General Administration of Kolhapur State From Year 1884 to 1940 (Total Fifty - Six)

## गॅझेटियर

कोल्हापूर गॅझेटियर : मुंबई इलाख्याचे गॅझेटियर, पुस्तक नं. २४, बा. प्र. मोडक यांनी मराठीत भाषांतर केलेले, कोल्हापूर, १८९०.

Gazeteer of Bombay Presidency, VOl. XXIV, James Campbeel, 1883.

चौधरी की. का. (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, कोल्हापूर जिल्हा, महाराष्ट्र, १९८९.

## वृत्तपत्रे

दैनिक पुढारी, कोल्हापूर

सत्यवादी, कोल्हापूर

साप्ताहिक शिवतेज

संग्राम

## निवडक मराठी संदर्भ ग्रंथ


अत्रे, त्रि. ना. : गावगाडा, प्रथमावृत्ती, मुंबई, प्रकाशन मोटे, छ. वि., १९७५.

कीर, धनंजय : राजर्षी शाहु छत्रपती – एक समाजक्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९७९.

कडियाळ, रा. अ. : सत्यशोधक कै. नामदार भास्करराव जाधव यांचे जीवनकार्य, इंदुमती प्रकाशन, कोल्हापूर, १९९०

डॉ. कुलकर्णी, अ. रा. : शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९३

कुलकर्णी मिना, कुलकर्णी ब. शि. : श्री शाहु छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५.

काळे, भगवान : संयुक्त महाराष्ट्र – काल आणि आज, संकेत प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९८.

कोल्हापूर नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव ग्रंथ, जी. ए. कदम, चीफ ऑफिसर, १९५४.

के., सागर : असा हा महाराष्ट्र, के. सागर प्रकाशन, पुणे, १९९४.

गर्गे, स. मा. : करवीर रियासत, दुसरी आवृत्ती, श्री. गो. य. राणे, प्रकाशन, १९७१.

गर्गे, स. मा. : करवीर रियासत, तिसरी आवृत्ती, श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर, २००३.

गुजर, मा. वि. : करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, भाग १ ते ८, पुणे, प्रकाशन गुजर मा. वि., १९६३.

गुळवणी मु. गो. : दख्खन दौलत पन्हाळा गड, कोल्हापूर, १९७५.

डॉ. घुगे, वि. बा. : छत्रपती शाहुंचे समाजवादी आर्थिक धोरण, रायटर्स, को-ऑप. सोसायटी, कोल्हापूर, १९७५.

डॉ. घुगे., वि. बा. : राजर्षि शाहु - अ. मॉडेल रुलर, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, १९९४.

प्रा. जीते, म. रा. : लढा भुमिपुत्राचा, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९ जुलै, १९९३.

जाधव, भ. भा. (संपा.) : राजर्षि शाहु महाराजांची भाषणे, कोल्हापूर, १९७१.

जाधव, रमेश : लोकराजा शाहु छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, १९९८.

तोफखाने, वा. द. : राजर्षि शाहु छत्रपतींचे अंतरंग, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९६३.

देशपांडे : करवीर राज्याचा इतिहास श्री. महाराणी ताराबाई टिचर्स कॉलेज, पुस्तकमाला नं. १, आर्युमान प्रेस, कोल्हापूर,१९३७.

धाटावकर, भास्कर (संपा.) : छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग १, पुराभिलेख विभाग महाराष्ट्र शासन, २००६.

नाईक, तु. बा. : छत्रपती शाहू महाराज, युनिव्हर्सल प्रकाशन, कोल्हापूर, १९८३.

पवार, शरद : महाराष्ट्र : एक दृष्टिकोन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, १९८९.

पवार, वसुधा : शाहू छत्रपती एक अभ्यास, सुमेरु प्रकाशन, पहिली आवृत्ती, २००४.

पचिंद्रे, श्रीराम : शाहू, विदर्भ सत्यशोधक मंडळ, अमरावती, पहिली आवृत्ती, २००४.

| | | |
|---|---|---|
| पारसनीस, डी. बी. | : | पन्हाळा, मुंबई, १९२३. |
| पाटील, शामराव व<br>धाटावकर भास्करराव (संपा.) | | राजर्षि शाहु छत्रपती यांचे निवडक आदेश भाग–एक, पुराभिलेख विभाग, १९८८. |
| पटवर्धन, व्ही. अ. | : | संस्थानातील लोकशाहीचा लढा, संस्थानी स्वराज्य कचेरी, सदाशिव पेठ, पुणे, १९४७. |
| फडके, य. दि. | : | विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ३,४५, श्री विद्या प्रकाशन पुणे. |
| फडके, य. दि. | : | शाहु छत्रपती आणि लोकमान्य, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे, १९८६. |
| बागल, माधवराव | : | अशी होती संस्थानी राजवट, माधवराव बागल, राजारामपुरी, कोल्हापूर, १९६४. |
| बागल, माधवराव | : | जीवनप्रवाह, माधवराव खंडेराव बागल, राजारामपूरी, कोल्हापूर, १९५४. |
| बगाडे, द. रा. | : | छत्रपती शाहु महाराज आणि कायदेकानु, पदम् प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९४२. |
| भिडे, ग. र. व<br>पु. ल. देशपांडे (संपा.) | : | कोल्हापूर दर्शन, इंटनॅशनल पब्लिशिंग सर्व्हिस, डेक्कन जिमखाना, पुणे, १९७१. |
| भोसले एस. एस. (संपा.) | : | क्रांतीसुक्ते राजर्षि शाहु छत्रपती यांची भाषण, कोल्हापूर, जिल्हा परिषद, १९७५. |
| भगत, रा. तु. | : | शिक्षण महर्षी राजर्षी शाहु महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९९. |
| भानसे, बाबा | : | किल्ले पन्हाळा, सन्मित्र प्रकाशन, १९६५. |

माळी,गुरुबाळ : वारसा कोल्हापुरचा, अनिल र. साळोखे, प्रोपायटर ए. एम्, प्रकाशन, कोल्हापूर, १९९९.

मोडक, बा. प्र. : कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थाने यांचा इतिहास पुवार्ध भाग १, १८७७.

कोल्हापूर राज्याचा इतिहास, १८९३.

येडेकर,शाम (संपा.) : राजर्षी शाहु छत्रपती यांची भाषणे, प्रथमावृत्ती, मंगल प्रकाशन, कोल्हापूर, १९७१.

यादव, उदयसिंह : राजर्षी, राजकीय प्रकाशन, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, १९८९.

राजेशिर्के, एम्. रावसाहेब : शेतकरी सहकारी संघ लि. कोल्हापूर, जुना राजवाडा, भवानी मंडप, कोल्हापूर, २००३.

लट्ठे, आण्णासाहेब : कोल्हापूर राज्याचा इतिहास, गणेश शंकर भोसले, विद्याविलास, कोल्हापूर, १९४२.

लट्ठे,आण्णा बाबजी : श्रीमंत छत्रपती शाहु महाराज यांचे चरित्र, बा. ल. पाटील, श्रीरामत्व प्रकाशन, कोल्हापूर, बेळगाव, १९२५.

शहा, रतनलाल डी. : कोल्हापूर दर्शन, प्रकाशन, कोल्हापूर जिल्हा विकास मंडळ १९५७.

शिर्के, दा. म. : कोल्हापूरचा राज्यकारभार, मसोजीमाने, कोल्हापूर, १९३४.

साठम, द. ना. : आधुनिक भगीरथ – राजर्षी शाहु, प्रहार प्रकाशन, कोल्हापूर.

साळुंखे, हिंदुराव : छ. शाहु स्मृतिदर्शन, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९८.

डॉ. संगवे विलास व डॉ. डी. बी. खणे : राजर्षी शाहु छत्रपती कागदपत्रे (खंड), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सुर्यवंशी, कृ. गो. : राजर्षी शाहु : राजा व माणुस, ठोकळ प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, फेब्रुवारी, १९८४.

साळुंखे, पी. बी. (संपा.) : शाहु गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई, १८७६.

सरदेसाई, गो. स. : मराठी रियासत, विजय प्रेस, पुणे, १९२५.

डॉ. सरदेसाई, बी. एन्., : आधुनिक महाराष्ट्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०००.

सबनीस, आर. व्ही. : नोट्स ऑन कोल्हापूर, बॉम्बे, द टाईम्स् ऑफ इंडिया, १९२८.

सांकलिया, एच. डी. आणि एम. जी. दीक्षित : ब्रम्हपुरी (कोल्हापुर) उत्खनन, १९४५-४६.

डॉ. हेरवाडे, श्रीधर : छत्रपती राजाराम चरित्र ग्रंथ, छत्रपती राजाराम प्रतिष्ठान, कोल्हापूर, १९८३.

प्रा. हरेल, केशव : राजर्षी शाहु महाराज यांचे राजकीय विचार, निर्मिती विचार मंच, प्रथमावृत्ती, २८ नोव्हेंबर, २००५.

## अप्रकाशित एम्. फिल व पीएच्. डी. प्रबंध

डॉ. खणे, बी. डी. : श्री. शाहु : अ स्टडी ऑफ सोशो – पोलिटिकल रिफॉर्म १८८४–१९२२, अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००४.

चरणकर, डी. एस. : द वर्क ऑफ पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट अंडर शाहु छत्रपती (१८८४–१८२२) अप्रकाशित एम्. फिल. लघुशोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००१.

डॉ. नलवडे, एम्. डी. : शाहु छत्रपती ऑफ कोल्हापूर : अ सोशल रिव्होल्युशनरी १८७४–१८२२ अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७८.

डॉ. पाटील, टी. एस्. : छ. राजारामकालीन कोल्हापूर संस्थानातील सामाजिक व राजकीय चळवळीचा अभ्यास १९२२ ते १९४०, अप्रकाशित एम्. फिल लघुशोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८९.

डॉ. पोवार, व्ही. एस्. : फ्रीडम मोव्हमेंट इन कोल्हापूर स्टेट, अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००२.

डॉ. माने, अ. रा. : छत्रपती राजाराम व त्यांचा काळ (१९२२ ते १९४०), अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९४.

वांकर, सु. चं. : कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास, अप्रकाशित एम्. फिल. लघुशोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९४.

डॉ. शिंदे, के. ए. : हिस्ट्री ऑफ कोल्हापूर स्टेट, अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००२.

## इंग्रजी दुय्यम साधने

Dr. Dhanagare D. N. : Peasant Movement in India 1920-1950 R. Dayal, Oxford University Press, Second Edition, 1986.

Keer Dhananjay : Shahu Chhatrapati. A Royal Revolutionary, Bombay, Popular Publication.

Kolhapur : Publicity Officer, Kolhapur State.

Dr. Kulkarni, A. R. : Maharasthra in the Age of Shivaji (A Study in Economic History), Prabha Publication Second Edition, 2002.

Catthe, A. B. : Memories of His Highness Shri. Shahu Chh. Maharaja of Kolhapur, Vol. I, The Times of India, Bombay, 1924.

Singh, A. K. : Peasant Revolt and Agrarian Reforms, Commonwealth Publisher, New Delhi, First Edition, 1988.